नि.दि.दा.क्र.६१/२०२२
प्रताप वगैरे वि. आरती वगैरे

## अर्ज निशाणी ९३ खालील आदेश
## (CNR MHSI080004222022)

०१. प्रस्तूतच्या अर्जान्वये वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.०९ सुनिता चंद्रकांत रावराणे यांच्या वारसांना दाव्याच्या अभिलेखावर घेण्यास विनंती केलेली आहे. त्यांनी पुढे असे नमुद केले आहे की, प्रतिवादी क्र.०९ हे दि.०८/०८/२०२४ रोजी मयत झाले आहेत. सबब, प्रस्तूत वादी यांनी प्रतिवादी क्र.०९ चे वारस अभिलेखावर घेण्याची विनंती केली आहे.

०२. प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी नि.क्र.९४ प्रमाणे आपले म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत घेतली आहे. त्यांच्या कथनानुसार, अर्जात नमुद मजकूर खोटा व खोडसाळ आहे, अर्जातील कारणे समर्पक व संयुक्तीक नाहीत. सबब, अर्ज नामंजूर करण्यात यावा. अर्ज मंजूर करण्याचा झाल्यास वादीकडू खर्चाची रक्कम प्रतिवादीस देण्यात यावी. प्रतिवादी क्र.८, १० व ११ यांनी सदर अर्जावर आपले म्हणणे दाखल करुन योग्य तो आदेश पारीत करण्याबाबत विनंती केली आहे.

०३. प्रस्तूत दावा वादीने दावा मिळकतींचे वाटप व पृथ्थक कब्जाकरीता दाखल केला आहे. प्रस्तूत प्रतिवादी क्र.०९ चे वारस हे प्रस्तूत दाव्यास आवश्यक पक्षकार आहेत. अर्जात नमूद कारण योग्य वाटते. सबब, वरील कारणमिमांसेचा सारांश असा की, प्रस्तूत अर्ज मंजूर करणे योग्य वाटते. करीता, खालील प्रमाणे आदेश पारित करत आहेः

### – आदेश –

०१. निशाणी क्र.९३ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

०२. वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.०९ यांच्या वारसांना प्रतिवादी क्र.०९ चे वारस

म्हणून अभिलेखावर समाविष्ट करुन घ्यावे

SHUBHAM GOVIND LATURIYA Digitally signed by SHUBHAM GOVIND LATURIYA Date: 2025.06.26 10:40:37 +0530

स्थळ : वैभववाडी (शुभम जी. लटुरिया)

दिनांक : २५/०६/२०२५ न्यायाधिकारी, ग्रामन्यायालय, वैभववाडी.